MHAK070006522014

**नियमित फौजदारी खटला क्र.१८०/२०१४**
**मधील निशाणी–१ वरील आदेश**
(दिनांक २९.०५.२०२६)

आरोपी यांचे विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ४०८ सह कलम ३४ अन्वये खटला सुरू आहे. प्रकरणाची पाहणी केली असता आरोपी हे राजस्थान राज्यातील रहिवासी असल्याचे दिसून येते. आरोपी जामीन दिल्यानंतर कधीही न्यायालयात हजर राहिलेले नाही. त्यांचे विरुद्ध वेळोवेळी गैर जमानती वॉरंट, जामीनदारास नोटीस आणि जाहीरनामा जारी करून देखील त्यांचा ठावठिकाणा मिळण्यास पोलीस यंत्रणा असमर्थ ठरली.

२. प्रकरण सन २०१४ पासून प्रलंबित असून आहे. प्रकरणात आरोपीची हजर होण्याची शक्यता नगण्य आहे. म्हणून आरोपी यांचे विरुद्ध प्रकरण फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अंतर्गत चालविण्याचा आदेश पारित केला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत:**

३. अशोका बिल्डकॉन लिमिटेड कंपनी, नाशिक मध्ये कार्यरत असलेले सुपरवायझर अमित सिंग रामचंद्र सिंग यांनी फिर्याद दिली की महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून शेळद ते अकोला ३३ केव्ही विद्युत वाहिनीचे पोल व त्यावरील तार टाकण्याचे काम त्यांना मिळाले होते व त्यानुसार रिधोरा शिवारात काम सुरू होते. सदर कामाकरिता त्यांनी दिनांक ५ ऑक्टोबर २०१३ रोजी ॲल्युमिनियम विद्युत तार दहा ड्रम व इतर लाईनचे साहित्य रिधोरा येथील हायवेच्या बाजूला शेख अनिस यांचे घरासमोरील मोकळ्या जागेत उतरून ठेवले होते. त्याच्या देखरेखी साठी लाईनचे काम करणारे मजूर महेंद्रसिंग चव्हाण व इतर सात–आठ मजूर नेमले होते आणि त्यांना राहण्यासाठी रिधोरा येथील गजानन ढगे यांची खोली भाड्याने केली होती.१३.१०.२०१० रोजी सुमारे साडेदहा वाजता त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता सर्व माल व्यवस्थित होता. तेथे असलेले १३ मजूर पैकी १० मजूर दोन–तीन दिवसांपूर्वी दसऱ्याचे सणानिमित्त गावी गेल्याचे चव्हाण यांनी सांगितले. दिनांक

१४.१०.२०१३ रोजी त्यांनी जाऊन पाहिले असता त्यांना वरील ठिकाणी नमूद माला पैकी ॲल्युमिनियम कारचे दहा बंडल दिसून आले नाही. म्हणून त्यांनी शेख अनिस व गजानन ढगे यांच्याकडे चौकशी केली असता त्यांना समजले की, त्यांच्याकडे काम करणारे चव्हाण, इतर दोन मजूर आणि काही अनोळखी इसमांनी दिनांक १३.१०.२०१३ रोजी दुपारी १२ ते १ च्या सुमारास क्रेन व ट्रकच्या सहाय्याने दहा बंडल उचलून नेले. त्यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही. सदर बंडल चोरी झाल्याची खात्री झाल्याने त्यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला.

**४.** दिलेल्या रिपोर्ट वरून आरोपी यांचे विरुद्ध अपराध क्रमांक २०२/२०१३ भारतीय दंड विधान कलम ४०८ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक सुनील सोळंके यांनी केला. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे जाब जबाब नोंदवले. तपासाअंती त्यांनी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**५.** उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे तपासा दरम्यान जामीन मिळवल्यानंतर आरोपी न्यायालयात हजर राहिले नाही. त्यामुळे साक्षीदारांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे तपासण्यात आले. अभियोग पक्षाने साक्षीदार योगेश नदी आणि शेख आदिल शेख माणू यांना तपासले आहे. पुरेशी संधी देऊन देखील अभियोग पक्ष इतर साक्षीदारांना हजर ठेवणे असमर्थ ठरला. म्हणून प्रकरणाचा कालावधी पाहून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तपासलेल्या साक्षीदार याच्या साक्षीतून काही निष्पन्न झाले नाही. त्यांनी त्यांच्या पुराव्यात त्यांचे समक्ष कोणताही पंचनामा झाला नसल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे त्यांचा पुरावा उपयुक्त नाही.

**६.** एकंदरीत तपासलेल्या साक्षीदाराच्या साक्षीतून आरोपी विरुद्ध दोषारोप निश्चित होईल इतका पुरावा आलेला नाही. माननीय सर्वोच्च न्यायालय आणि माननीय उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी जुनी प्रकरणे निकाली करणे संदर्भात कनिष्ठ न्यायालयांना निर्देशित केलेले आहे. प्रकरणाची एकूण परिस्थिती पाहता प्रस्तुत प्रकरण प्रलंबित ठेवल्यास काहीही साध्य होणार नाही. म्हणून आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २३९ अन्वये दोषमुक्त करणे न्यायसंगत होईल. सबब, मी खालील आदेश पारित

करीत आहे.

**आदेश**

१) आरोपी क्रमांक १ ते ३ यांची भारतीय दंड विधान कलम ४०८ सह कलम ३४ या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ अन्वये दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपींचा जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.05.29 17:17:27 +0530

दिनांकः २९.०५.२०२६
बाळापूर.

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 29/05/2026 |
| Order signed by P.O on | :- | 29/05/2026 |
| Order uploaded on | :- | 29/05/2026 |